




पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष
स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com








■ वर्ष ७६ वे/अंक २०६ वा ■ ■ अमरावती, रविवार,दिनांक १५ मार्च २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर २४ फाल्गुन १९४७ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■







# होर्मुझ स्ट्रेटमधून भारताकडे निघाले एलपीजीचे दोन जहाज

## थेट गुजरातला पोहोचणार गॅसचे टँकर



नवी दिल्ली दि. १४ : इराण-इस्रायल आणि अमेरिकेच्या युद्धामुळे भारतात एलपीजी गॅसची टंचाईदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. देशात निर्माण झालेल्या टंचाई दूर करण्यासाठी केंद्र सरकार नव-नवीन उपाययोजना करत आहे. अमेरिकेच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने सामुद्रधुनी मार्ग बंद केला आहे. यामुळे अनेक देशांची व्यापारी वाहतूक बंद झाली आहे. तर भारतात तेल पुरवठा खंडित झाला आहे. मात्र भारताच्या जहाजांना इराणनं सामुद्रधुनीमधून जाण्यास परवानगी दिल्यानं देशातील गॅसची टंचाई लवकरच दूर होणार आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी शनिवारी दिल्लीत पत्रकार परिषदेत एलपीजीबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. भारताकडे जाणारी काही जहाजे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून निघाली आहेत. भारताचे शिवालिक आणि नंदा देवी या दोन जहाजांनी सामुद्रधुनी ओलांडली आहे, आणि आता ते भारतीय बंदरांकडे येत असून लवकरच गुजरातच्या मुद्रा बंदरा पोहोचतील. या दोन्ही जहाजांमध्ये ४६,००० मेट्रिक टनांपेक्षा जास्त एलपीजी भरलेले आहेत. यामुळे एकूण ९२,७०० मेट्रिक टन एलपीजीचा पुरवठा होणार आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, आखाती प्रदेशात अनेक भारतीय जहाजे अजूनही *(पान २ वर)*

# बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्यक बनवले जात आहे, आता...; मोदींचा ममता सरकारवर थेट हल्ला

कोलकाता दि. १४ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पश्चिम बंगालमध्येच ममता सरकारवर थेट निशाणा साधला. कोलकात्यातील 'परिवर्तन संकल्प यात्रा' सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्यक बनवले जात आहे. आता या 'निर्मम' सरकारचा अंत निश्चित असून बंगालमधून महाजंगलराजचा खात्मा निश्चित आहे.



तृणमूल काँग्रेसने सभेला येणाऱ्या नागरिकांना 'चोर' म्हणून संबोधल्याचा उल्लेख करत मोदी म्हणाले, खरे चोर कोण आहेत हे बंगालची सुजाण जनता ओळखून आहे. आपली सत्ता जात असल्याचे पाहून येथील सरकार सैरभैर झाले आहे. ते केंद्र सरकारच्या योजनांमध्ये अडथळे आणत आहेत. या योजनांसाठी राज्याला एक पैसाही द्यायचा नाही, तरीही केंद्राच्या योजनांचा लाभ बंगालमधील जनतेला मिळू नये, असे इथल्या सरकारला वाटते. असा आरोप त्यांनी केला.

**आयुष्मान भारत योजनेवरून निशाणा**

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात आयुष्मान भारत योजनेचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले, टीएमसी सरकार आपल्या स्वार्थी राजकारणामुळे ही योजना राज्यात लागू करत नाही. यामुळे बंगालमधील कुटुंब ५ लाख रुपयांपर्यंतच्या मोफत उपचारांपासून वंचित राहत आहेत. *(उर्वरित पान २ वर)*

# कागलमध्ये ३५७.९९ कोटींचा सर्व्हिस रोडसह ६ पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर मंजूर : गडकरी

कोल्हापूर दि. १४ : केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मोठी घोषणा केली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग-४८ वर ६-लेन एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या (उन्नत मार्ग) बांधकामाला मंजुरी देण्यात आली असून, यासाठी ३५७.९९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. दरम्यान, नितीन गडकरी यांनी एलिव्हेटेड कॉरिडॉरला मंजुरी दिल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पीएम मोदी आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.



कागल शहराच्या हद्दीत महामार्गाच्या दोन्ही बाजूंना ३-लेन काँक्रीट सर्व्हिस रस्त्यासह हा ६-लेन एलिव्हेटेड कॉरिडॉर उभारला जाणार आहे. यामुळे महामार्गावरून जाणारी लांब अंतराची अवजड वाहतूक वरून (एलिव्हेटेड मार्गावरून) जाईल, तर स्थानिक वाहतूक खालच्या सर्व्हिस रोडवरून सुरळीतपणे *(उर्वरित पान २ वर)*

# 'आमचे हितसंबंध एकच, म्हणून आम्ही भारतीय जहाजे सोडली...'; इराणी राजदूतांचे मोठे विधान

तेहरान दि. १४ : पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षादरम्यान काही भारतीय जहाजांना होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाण्याची परवानगी देण्यात आल्याचे इराणचे भारतातील राजदूत मोहम्मद फताली यांनी शनिवारी सांगितले. दोन्ही देशांमधील दीर्घकालीन मैत्रीपूर्ण संबंध आणि सामायिक हितसंबंध लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



इराणी राजदूत मोहम्मद फताली यांनी इंडिया टुडेने घेतलेल्या विशेष मुलाखतीत बोलताना हे विधान केले. सुरुवातीला भारताशी संपर्क स्थापित करण्यात काही अडचणी होत्या, परंतु आता दोन्ही देश एकमेकांना सहकार्य करत *(पान २ वर)*

# एलपीजी गॅसची कोणतीही कमतरता नाही, काँग्रेस पक्ष लोकांच्या मनात भीती तयार करतोय : फडणवीस

मुंबई दि. १४ : मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे देशभरातील गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला असून अनेक ठिकाणी पुरवठा विस्कळीत झाल्याचे चित्र आहे. या परिस्थितीच्या झळा महाराष्ट्रातही पोहोचल्याने राज्यात गॅस टंचाईची समस्या निर्माण झाली आहे. सरकारकडून गॅस पुरवठा सुरळीत असल्याचा दावा करण्यात येत असला, तरी प्रत्यक्षात अनेक भागांत ग्राहकांना वेळेवर सिलेंडर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. बुकिंग करूनही गॅस उपलब्ध होत नसल्याने नागरिकांना गॅस एजन्सीसमोर तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. राज्यातील अनेक शहरांमध्ये पहाटेपासूनच गॅस एजन्सी कार्यालयांबाहेर ग्राहकांची मोठी गर्दी होत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. आता या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गॅस पुरवठ्याबाबत सविस्तर भाष्य केलंय. एलपीजी गॅसची कोणतीही कमतरता नाही, काँग्रेस पक्ष लोकांच्या मनात भीती तयार करतोय, असा आरोप त्यांनी केलाय. *(उर्वरित पान २ वर)*



# देशातील २९ राज्यांमध्ये व्यावसायिक सिलेंडरच्या पुरवठ्यास सुरुवात

नवी दिल्ली दि. १४ : अमेरिका आणि इस्राइलने इराणविरोधात सुरू केलेल्या युद्धाला आज पंधरा दिवस पूर्ण झाले आहेत. या युद्धामुळे आखातामध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच आखातामधील तणावामुळे भारतात अभूतपूर्व अशी गॅस टंचाई निर्माण झाली आहे. त्यात केंद्र सरकारने व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा बंद केल्याने आणि गॅसटंचाईच्या संकटाच्या भीतीने घरगुती गॅस ग्राहकांनी गॅस पुरवठा करणाऱ्या एजन्सींसमोर सिलेंडरसाठी रांगा लावल्याने परिस्थिती अधिकच बिघडल्याचं चित्र निर्माण झालं होतं. दरम्यान, आज केंद्र सरकारने व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा पुन्हा सुरू केला आहे.



पेट्रोलियम मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, देशातील २९ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा सुरू करण्यात आला आहे. व्यावसायिक सिलेंडरबाबत खूप चर्चा झाली आहे. त्यानंतर व्यावसायिक ग्राहकांना काही एलपीजी देण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच याबाबत राज्य सरकारशीही चर्चा झाली आहे. दरम्यान, देशाकडे गॅसचा पुरेसा साठा आहे. तसेच गॅसची कुठलीही टंचाई नाही आहे. असं असलं तरी लोक मोठ्या प्रमाणावर पॅनिक बुकिंग करत आहेत. त्यामुळे लोकांनी पॅनिक *(उर्वरित पान २ वर)*

## माहोल....




युद्धामुळे गॅस संपलं, हॉटेल बंद लोकांना युद्धाची भीती आणि मला तुझ्या स्वयंपाकाची!

# आम्ही लवकरच होर्मुझची सामुद्रधुनी खुली करू डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरोधात थोपटले दंड

वॉशिंग्टन दि. १४ : इराणच्या किनाऱ्यावर अमेरिका जोरदार बॉम्ब वर्षाव करत राहील आणि इराणच्या बोटी व जहाजे सातत्याने उद्ध्वस्त करेल. कोणत्याही परिस्थितीत आम्ही लवकरच होर्मुझची सामुद्रधुनी वाहतुकीसाठी खुली करू, सुरक्षित आणि मुक्त करू, असे सांगत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझसाठी इराणविरोधात दंड थोपटले आहेत.

होर्मुझ सामुद्रधुनीतून ये-जा करणाऱ्या तेल जहाजांवर इराणकडून हल्ले केले गेले. त्यामुळे सर्वच देशांनी सामुद्रधुनीतून वाहतूक थांबवली आहे. इराणने तीन जहाजांवर हल्ले केले आहेत. होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक ठप्प झाल्याने अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर हल्ले करण्याची धमकी दिली आहे.



डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याच्या केलेल्या प्रयत्नामुळे प्रभावित झालेले अनेक देश, ही सामुद्रधुनी खुली आणि सुरक्षित ठेवण्यासाठी अमेरिकेच्या सोबतीने आपल्या युद्धनौका पाठवतील.

आम्ही इराणची १०० टक्के लष्करी क्षमता आधीच नष्ट केली आहे, परंतु त्यांचा कितीही मोठा पराभव झालेला असला तरीही, त्यांच्यासाठी एखादा-दुसरा ड्रोन पाठवणे, पाण्यात सुरुंग पेरणी करणे किंवा या जलमार्गावर कुठेतरी कमी पल्ल्याची मिसाईल डागणे सोपे आहे, असेही ट्रम्प यांनी म्हटले आहे.

या कृत्रिम अडथळ्यामुळे ज्यांच्यावर परिणाम झाला आहे, असे चीन, फ्रान्स, जपान, दक्षिण कोरिया, ब्रिटन आणि इतर देश या भागात आपल्या नौका पाठवतील अशी आशा आहे; जेणेकरून पूर्णपणे नामोहरम झालेल्या राष्ट्राकडून होर्मुझच्या सामुद्रधुनीला पुन्हा कधीही धोका निर्माण होणार नाही, असे आवाहन ट्रम्प यांनी केले आहे.

ट्रम्प यांनी पुढे म्हटले आहे की, दरम्यानच्या काळात अमेरिका इराणच्या किनारपट्टीवर जोरदार बॉम्बफेक *(उर्वरित पान २ वर)*






# खा. राहुल गांधी विरोधात भाजपाचे जोडे मारो आंदोलन




अमरावती दि.१४ : अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान काँग्रेसनेते खा. राहुल गांधी यांनी संसदेच्या प्रवेशव्दारावर उभे राहुन केलेल्या अशोभनिय आंदोलनाच्या निषेधार्थ शहर भाजपाच्यावतीने राजकमल चौकात राहुल गांधीच्याविरोधात जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

संसदेत १२ मार्च रोजी केंद्रीय अर्थसंकल्प सुरू असताना काँग्रेस नेते राहुल गांधी व काँग्रेस खासदार यांच्या द्वारे संसदेच्या मकर द्वारावर विचित्र प्रकारे आंदोलन करण्यात आले, ही बाब लोकशाहीच्या मंदिरात घडणे अत्यंत खेदजनक आहे, भाजपा अमरावती शहर जिल्ह्याच्या वतीने या विषयाचा निषेध आंदोलन करण्यात आले. राजकमल चौक अमरावती येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहुन भाजपा कार्यकर्त्यांनी खा. राहुल गांधी यांच्याविरोधात आंदोलन केले. यावेळी भाजपा कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या प्रतिमेला जोडे मारुन निषेधाच्या घोषणा दिल्यात.

भाजपा शहराध्यक्ष डॉ नितीन धांडे यांच्या नेतृत्वात केलेल्या या निषेध आंदोलनात किरण पातूरकर,बादल कुलकर्णी, राधा कुरिल,सुनिल खराटें, सचिन रासने राजू कुरील, मिलिंद बांबल, गजानन देशमुख, कमल मालवीय आकाश पाटील, संजय शादी, लता देशमुख, लविना हर्षे , वंदना मडगे, विनोद तानबैस, राजेंद्र मेटे , कुणाल टिकले, उमेश निलगिरें, अलका सरदार, शैलेंद्र चव्हाण, प्रफुल बर्वे, तुषार चौधरी,आकाश पाटील, कीर्तिदीप सराफ,दिपक अनासाने, अशोक पंचारें, आदित्य खैरकार, *(उर्वरित पान २ वर)*











